| | |
|---|---|
| MHAU050023782024 | **फौ.किरकोळ अर्ज.क्र.२४९/२०२४**<br>जयश्री परमानंदसागर परदेशी व इतर<br>**विरुध्द**<br>परमानंदसागर मदन परदेशी व इतर |

## निशाणी ०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौंटुबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे गैरअर्जदाराकडुन अंतरिम संरक्षण व अंतरिम पोटगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे विव्दान वकील श्री. आर. एस. डमाळे आणि गैरअर्जदारातर्फे श्री. जी. एम. शेख यांचा युक्तिवाद ऐकला.

३. उभय पक्षकरांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने गैरअर्जदारांनी तिच्यावर वेळोवेळी कौंटुबिक हिंसाचार केला हे सिध्द करते काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचार कायदा कलम २३ नुसार गैरअर्जदारकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते काय ? | अंशतः होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

४. अर्जदाराने अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी निशाणी ३ नुसार स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. याव्यतिरिक्त अर्जदाराने निशाणी ४ वरील यादीसोबत गट नंबर १५८ मौजे खानापुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर येथील शेतीचा ७/१२ उतारा, तसेच गैरअर्जदार क्र.२ च्या नावे वाहन नोंद असल्याबाबतचा तपशील दाखल केला आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ ने स्वत:ची सॅलरी स्लीप दाखल केलेली आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे स्वत:चे मालमत्ता व दायित्त्व प्रमाणपत्र दाखल केलेले आहे.

५. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.१३.०५.२०२२ रोजी हिंदु शास्त्र रितीरिवाजाप्रमाणे मौजे धोंदलगाव, ता. वैजापुर येथे संपन्न झाला. अर्जदार हिच्या आईवडीलांनी सदरील विवाहात ५ ते ६ लाख रुपये खर्च केलेला आहे. सदरील विवाहातुन अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना अर्जदार क्र.२ ही मुलगी आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडे नांदण्यास गेली. गैरअर्जदार याने अर्जदार हिस लग्नानंतर आठ महिने चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार हे अर्जदार हिस शारिरीक व मानसीक त्रास देत असे. तसेच अर्जदारास म्हणत असे की, तुला जर नांदायचे असेल तर तुझे माहेरहुन घर बांधण्यासाठी १ लाख रुपये घेऊन ये, नसता तुला नांदविणार नाही असे म्हणुन अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण करत असे.

६. अर्जदाराचे पुढे असे कथन असे की, गैरअर्जदार क्र.६ ही माहेरी आल्यावर अर्जदार हिला त्रास देत असे व टोचुन बोलत असे. अर्जदार ही गैरअर्जदार याचे वागण्यात कधीतरी बदल होईल अशी आशा ठेवुन गैरअर्जदारांचा सर्व त्रास सहन

करुन सासरी नांदत होती. गैरअर्जदार क्र.५ ही गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांचे कान भरवत असे. त्यामुळे सासरचे लोक हे अर्जदार हिला कायम त्रास देऊन मारहाण करुन तिचा गळा दाबुन तिला जिवे मारण्याचा प्रयत्न करत असे. दि.२९.०५.२०२४ रोजी गैरअर्जदारांनी अर्जदार हिला घर बांधण्यासाठी १ लाख रुपये घेऊन ये असे म्हणुन कोणतेही कारण नसतांना मारहाण करुन अंगावरच्या कपड्यानिशी मुलीसह घराबाहेर काढुन दिले आहे. तेव्हापासुन अर्जदार तिच्या मुलीसह तिच्या आईवडीलांकडे नाईलाजास्तव राहत आहे.

७. अर्जदारांचे पुढे कथन की, अर्जदारांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचारासाठी व प्रवास खर्च दरमहा ३०,०००/- रुपये खर्च येतो व ते कमवण्यास अर्जदार क्र.१ ही असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा फायनान्स बँकेत नोकरीस असुन, त्यास दरमहा ४५,०००/- रुपये पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार यांना मौजे खानापुर येथे ३ एकर बागायती शेती आहे, तसेच इतर ठिकाणी जमीन आहे व हारेगाव येथे मोठे आर.सी.सी. घर आहे, त्यापासुन त्यांना वार्षीक ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र.२ यांच्या मालकिचा ट्रक असुन त्यापासुन त्यांना महिन्याला जवळपास ७० ते ८० हजार रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे चार चाकी कार असुन ती भाडे तत्वावर दिली जाते व त्यापासुन देखील महिन्याला जवळपास ५० ते ६० हजार एवढे उत्पन्न मिळते. गैरअर्जदार याचेवर अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे त्याची अर्जदार यांना स्वतंत्र पोटगी देण्याची ऐपत व जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याचेकडुन अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा ३०,०००/- रुपये अंतरिम पोटगी मिळणेबाबत विनंती केली.

८. गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांनी प्रकरणात हजर होवुन, त्यांचे लेखी म्हणणे **निशाणी १२** वर दाखल केले आहे आणि अर्जदाराने केलेल्या सर्व तक्रारी त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी म्हणण्यात अर्जदारासोबत

असलेले नातेसबंध मान्य केलेले आहे. तसेच उभयांतील विवाहसबंध अद्यापपावेतो कायम असल्याचे गैरअर्जदाराला मान्य आहे. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणण्यात कथन केले आहे की, सदरचा विवाह कोवीड १९ या कालखंडात झाल्यामुळे १० ते २० लोकांमध्ये एका छोट्याशा १० बाय १० च्या मंडपामध्ये झाला आहे. विवाहानंतर पहिल्याच दिवाळीला अर्जदार ही माहेरी गेली असता, तिने दोन तीन दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ यास फोन करुन सांगीतले की, आपण वेगळेच राहु आणि आपले आयुष्य मजेत जगू. तसेच अर्जदार हिने तिच्या आईवडीलांमार्फत गैरअर्जदार यास त्यांच्या घरात खुप काम आहे, म्हणुन वेगळे राहण्यास सांगा असे सांगीतले, वेगळे रहा नाहीतर ती तिच्या जिवाचे बरेवाईट करुन घेईल व पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्याविरुध्द तक्रार करेल अशा धमक्या देत असे. गैरअर्जदार क्र.१ यास मिळणार पगार हा जेमतेम आहे. तसेच त्याच्यावर त्याचे आईवडील व बहिण यांची जबाबदारी आहे. दि.१५.०८.२०२३ रोजी गैरअर्जदार यांच्या घरात कोणी नसताना अर्जदार हिने सासुने मला चाकु मारला असा आरडाओरडा केला, त्यावेळी समोर पाटलांच्या येथे कामाला असलेले गणीभाई इनामदार यांच्या फोनवरुन तिच्या भावाला फोन केला व माहेरी निघुन गेली. त्यानंतर चार–पाच महिन्यानंतर अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ यांनी तिचे नरडे दाबले व तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला असा आरडाओरडा केला व तिच्या आईवडीलांना फोन केला. तिचे आईवडील हे गैरअर्जदार यांच्या घरी हारेगाव येथे आले व त्यांनी गैरअर्जदार यांना शिवीगाळ करुन दि.२९.०५.२०२४ रोजी अर्जदार हिस त्यांच्या घरी घेऊन गेले व संपुर्ण समाजात गैरअर्जदार यांची बदनामी केली. अर्जदार हिने स्वत:हुन गैरअर्जदार क्र.१ चा त्याग केला आहे. गैरअर्जदार क्र.१ यास पुरेसे उत्पन्नाचे साधन नाही, तसेच त्यांचेवर आईवडील व लहान बहिणीची जबाबदारी आहे. म्हणुन तो अर्जदार सोबत वेगळे घर करुन राहु शकत नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार यास तिने मागणी केल्याप्रमाणे वेगळी पोटगी देवु शकत नाही व तशी त्याची ऐपत नाही. त्याप्रमाणे अर्जदार हिच्यावर कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार झाला नाही. करिता, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची

विनंती केली.

९.        प्रस्तुतचा अर्ज विचारात घेतांना अर्जदार हिने गैरअर्जदार यांनी तिच्यावर वेळोवेळी कौटुंबिक हिंचासार केला, ही बाब तिने प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे. गैरअर्जदाराने अर्जदारासोबत पती–पत्नी नाते असल्याचे व उभयतांचे लग्नसंबंध अद्यापपावेतो कायम असल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदारासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करत आहे.

१०.        सदरची स्टेज प्राथमिक असल्यामुळे अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रथम दर्शनी तिच्यावर गैरअर्जदार यांचेकडुन कौटुंबिक हिंसाचार झाला हे सिध्द करणे आवश्यक आहे. सदरील बाब सिध्द करणेसाठी अर्जदार यांनी तिच्या मुळ अर्जात व अंतरिम पोटगी मिळणेसाठीच्या अर्जात गैरअर्जदार यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप प्रतिज्ञापत्रावर केलेले आहेत. सदरील कथने अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार सिध्द करणेसाठी प्रथमदर्शनी पुरेसे आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात केलेल्या कथनानुसार व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत आहे.

११.        अर्जदार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे प्रथमदर्शनी दाखवल्यामुळे ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत विविध फायदे (Reliefs) मिळण्यास पात्र ठरते. सदरील अंतरिम अर्जाद्वारे अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडुन दरमहा ३०,०००/– रुपयांची अंतरिम पोटगी मागीतलेली आहे.

१२.        अंतरिम पोटगी मंजुर करतेवेळी अर्जदार व गैरअर्जदार यांची आर्थीक परिस्थिती ही भुमिका पार पाडत असते. अर्जदार हीने अर्जात नमुद केले आहे की, ती पुर्णपणे गैरअर्जदारावर अवलंबुन आहे. ती तीच्या आईवडीलांकडे राहते. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा फायनान्स बँकेत

नोकरीस असुन, त्यास दरमहा ४५,०००/– रुपये पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार यांना मौजे खानापुर येथे ३ एकर बागायती शेती आहे, तसेच इतर ठिकाणी जमीन आहे व हारेगाव येथे मोठे आर.सी.सी. घर आहे, त्यापासुन त्यांना वार्षीक ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळते, तसेच गैरअर्जदार क्र.२ यांच्या मालकिचा ट्रक असुन त्यापासुन त्यांना महिन्याला जवळपास ७० ते ८० हजार रुपये उत्पन्न मिळते, तसेच गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे चार चाकी कार असुन ती भाडे तत्वावर दिली जाते व त्यापासुन देखील महिन्याला जवळपास ५० ते ६० हजार एवढे उत्पन्न मिळते. अर्जदार यांनी अभिलेखावर मौजे खानापुर, ता. वैजापुर येथील जमीनीचा सातबारा दाखल केले आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने त्याच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर सॅलरी स्लीप दाखल केली आहे. गैरअर्जदार क्र. १ यास खाजगी नोकरीतुन उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार यास उत्पन्नाचे साधन आहे, ही बाब स्पष्ट होते. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.२ यांचा नावावर शेतजमीन असल्याबाबतचा सातबारा उतारा, तसेच वाहन नोंदीचा तपशील दाखल केलेला आहे. यावरुन अर्जदार क्र.२ ते ४ हे गैरअर्जदार क्र. १ वर अवलंबुन असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्यासाठी सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. याउलट अर्जदाराकडे स्वतःचे उत्प–न्नाचे साधन नाही. मुळ अर्जाचा निकाल लागण्यासाठी बराचसा कालावधी जाणार आहे. अर्जदार हिस वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात हजर रहावे लागणार आहे. तिला वकील फी व जाणे–येण्याचा खर्च सोसावा लागेल, तसेच दरम्यानच्या काळात तिला तिच्या आईवडीलांच्या आश्रयाने जीवन व्यतीत करावे लागणार आहे. त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ यांचेकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील विवेचनाचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ ला प्रति महिना ४,५००/– रु. व अर्जदार क्र. २ ला प्रति महिना ३,५००/– रु. अंतरिम पोटगी देणे जास्त न्यायसंगत होईल. करीता मी मुद्दा क्र.१ व २ यांचे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः</u>**

**१३.** मुद्दा क्र.१ व २ च्या उत्तरादखल अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरलेले आहेत. करिता, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ याने मुळ अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून अर्जदार क्र. १ ला प्रति महिना ४,५००/– रु. व अर्जदार क्र. २ ला प्रति महिना ३,५००/– रु. म्हणजेच एकत्रित प्रतीमहा ८,०००/– रुपये (अक्षरी आठ हजार रुपये मात्र) अंतरिम पोटगी द्यावी.

३) गैरअर्जदार क्र.१ ने प्रतीमहा ८,०००/– रु. रक्कम अर्जदारास हमदस्त द्यावी किंवा न्यायालयात जमा करावी.

४) या आदेशाची प्रमाणीत प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KALE NILESH SUDAM
Date: 2026.02.02 17:01:40 +0530

**दिनांकः** ०२.०२.२०२६.
**वैजापूर.**

( एन.एस. काळे )
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापूर.**